**भास्कर मुलाखत** वेदांता ग्रुपच्या ४ वेगवेगळ्या कंपन्या भारतात लिस्ट झाल्या, चेअरमन अनिल अग्रवाल यांची 'भास्कर'शी खास बातचीत

# भास्कर : ४ कंपन्यांना तुम्ही का वेगळे केले?

# अग्रवाल : मुले मोठी झाली की त्यांना स्वतंत्र सोडायला हवं, माझी प्रत्येक कंपनी ५ वर्षांत १०० अब्ज डॉलरची होईल

अरुण चौहान | मुंबई

वेदांता समूहाने आपल्या इतिहासातील सर्वात मोठा निर्णय घेत आपल्या चार प्रमुख कंपन्यांच्या विभाजनाची घोषणा केली. या ४ कंपन्या (वेदांता अॅल्युमिनियम, वेदांता ऑइल अँड गॅस, वेदांता आयर्न अँड स्टील व वेदांता पॉवर) सोमवारी भारतात लिस्ट झाल्या. या चारही कंपन्यांचे एकूण मार्केट व्हॅल्यू ४९ हजार कोटींनी वाढून ३.५२ लाख कोटी रुपये झाले. या मेगा मूव्हनंतर वेदांताचे चेअरमन अनिल अग्रवाल यांनी दिव्य मराठीशी एक्सक्लुझिव्ह बातचीत केली. सांगितले की, १३ वर्षांनंतर या निर्णयामागे काय व्हिजन आहे? यातून देशात किती नवीन रोजगार निर्माण होतील? मुलींबाबत विचार बदलणे का गरजेचे आहे?

**▪ सुमारे 13 वर्षांनंतर एवढ्या मोठ्या स्तरावर आपल्या कंपन्यांना वेगळे करण्याचे पाऊल का उचलले?**

मुले जेव्हा मोठी होतात, तेव्हा त्यांना स्वतंत्र सोडून द्यायला हवे. आमच्या बिझनेसमध्ये एवढी क्षमता आहे की ते वेगळे होऊन आणखी मोठा वटवृक्ष बनू शकतील. मुख्य लक्ष्य आत्मनिर्भरता आहे. विदेशी शक्तींनी आम्हाला केवळ आयात करणारी बाजारपेठ बनवले होते, तर आपल्या भूमीत संसाधने मुबलक प्रमाणात आहेत. डिमर्जरमुळे प्रत्येक बिझनेसला आपली वेगळी ओळख मिळेल.

**▪ पुढील ५ वर्षांसाठी तुमचा रोडमॅप काय आहे आणि यातून किती रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे?**

आमचे लक्ष्य आहे की येणाऱ्या काळात प्रत्येक कंपनी १०० अब्ज डॉलर (सुमारे ९.४५ लाख कोटी रु.) मूल्याची बनावी. भारतात अॅल्युमिनियम, झिंक, आयर्न-स्टील आणि पॉवर सेक्टर्समध्ये ११% ते १५% पर्यंत वार्षिक ग्रोथ आहे. या विस्तारामुळे डाउनस्ट्रीम उत्पादनांचे छोटे कारखाने उभारले जातील, ज्यामुळे देशात सुमारे २-३ लाख रोजगार निर्माण होतील.

**▪ ऊर्जा क्षेत्रात नव्या योजना काय? प्लँट कुठे?**

आमच्या कोळशात जगात सर्वात कमी सल्फर आहे. आता आम्ही देशात उपलब्ध असलेल्या मुबलक थोरियमचा वापर करून न्यूक्लिअर पॉवरच्या क्षेत्रात येत आहोत. आम्ही २०,००० मेगावॅटचा प्लांट उभारू, ज्यामुळे देशातील २५% वीज निर्माण होईल. काही राज्यांमध्ये आमच्याकडे 'ब्राउनफिल्ड' लोकेशन्स आहेत, पण अंतिम मंजुरी मिळाल्यानंतरच या राज्यांची नावे अधिकृतपणे घोषित केली जातील.

## थेट स्टार्टअपचा विचार करू नका, नोकरी करून शिकणे जास्त गरजेचे



मुलांना भरकटवू नये. देशात सुरुवातीच्या काळात नोकरी खूप महत्त्वाची असते, कारण तेथूनच तुम्ही काम शिकता. पण नोकरी अशा ठिकाणी शोधा जी एखाद्या उद्योजकाची कंपनी असेल आणि मार्केटमध्ये लिस्टेड असेल. तिथे काम शिका आणि मग पुढे जा. लॅपटॉप ही जगाची खिडकी आहे, एआयला समजून घ्या आणि जर ते मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर्सच्या स्टार्टअप्समध्ये गेले, तर तिथे फसवणूक होण्याची शक्यता नगण्य आहे.

## प्रगतीसाठी सर्वात महत्त्वाचे काय?

### आमच्याकडे ५०% महिला... जिथे जिथे त्या, तिथे प्रगती...

पालकांसाठी सर्वात महत्त्वाचे आहे की त्यांनी मुलींना पुढे आणावे. त्या मुलांपेक्षा चांगले काम करतील. सुरुवातीला सरकारने बंदी घातली होती की मायनिंग आणि रेस्क्यू टीममध्ये मुली जाऊ शकत नाहीत. आम्ही सरकारकडून परवानगी घेतली. आमच्याकडे ५०% महिला आहेत. जिथे मुली जास्त, तिथे वेगाने ग्रोथ झाली. सून असो वा मुलगी, त्यांनी काही ना काही क्रिएटिव्ह काम नक्की करावे, ज्यातून उत्पन्न मिळेल. मुली मुलांपेक्षा वेगळा विचार करतात. आमच्या प्रगतीत दुसरे मोठे योगदान एआयचे आहे.